# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

वास्तुशास्त्रज्ञ, स्ट्रक्चरल कन्सल्टंट आणि इलेक्ट्रीकल कन्सल्टंट यांची
यादी तयार करण्याकरिता सूचना क्र.२/२०१८–१९

क्रमांक रातुमनावि/अ.वि./१८/३८७ दिनांक: २५/०५/२०१८

विद्यापीठाद्वारे ५ वर्षाच्या कार्यकाळाकरिता विद्यापीठाची पंजीकृत वास्तुशास्त्रज्ञ, स्ट्रक्चरल कन्सल्टंट आणि इलेक्ट्रीकल कन्सल्टंट, (विशेषीकृत सल्लागार) यांची यादी तयार करण्यासाठी इच्छुक वास्तुशास्त्रज्ञ, स्ट्रक्चरल कन्सल्टंट आणि इलेक्ट्रीकल कन्सल्टंट (विशेषीकृत सल्लागार) यांनी नोंदणी करणेस्तव: विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत असून पूर्णपणे भरलेले अर्ज दिनांक १२/०६/२०१८ पर्यंत पोहोचतील अश्या बेताने विद्यापीठ अभियंता, अभियांत्रिकी विभाग, महात्मा जोतीबा फुले शैक्षणिक परिसर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, अमरावती रोड, नागपूर या पत्यावर पाठवावेत. उशिरा प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्ज वेळेत न मिळाल्यास अथवा पोस्टात गहाळ झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी विद्यापीठावर राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

विद्यापीठात करण्यात येणारे नविन बांधकामे, विस्तारीकरणाचे कामे व नूतनीकरणाचे कामे करण्याकरिता वास्तुशास्त्रज्ञ, स्ट्रक्चरल कन्सल्टंट आणि इलेक्ट्रीकल कन्सल्टंट, (विशेषीकृत सल्लागार) यांच्याद्वारे कामाचे प्रस्ताव, आराखडा, अंदाजपत्रक, नियोजन, संरचना (स्ट्रक्चरल डिझाइन) तयार करणे, निरिक्षण करणे, सल्ला घेणे इत्यादी कामे करण्यात येईल.

विहित नमून्यातील अर्जासह फॉर्म क्र. I ते III मध्ये संपूर्ण माहीती भरून त्याच्या पुष्ठयार्थ लागणारी सर्व कागदपत्रे सत्यप्रतीसह व अनुक्रमांकासह अर्जा सोबत सादर करावयाची आहेत. सदर अर्जाचा नमूना व इतर माहीती विद्यापीठाच्या website - **www.nagpuruniversity.org** वरून प्राप्त करता येईल, इतर स्वरूपात भरलेले फार्म विचारात घेतले जाणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

**प्रभारी विद्यापीठ अभियंता**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ,नागपूर